# नंदुरबार मध्यम प्रकल्प विभागीय पथक,नंदुरबार
टोकर तलाव रोड,एस.पी.ऑफिस जवळ,
नंदुरबार--४२५४१२.

**Web Site :- www.wrd.gov.in**
**Email:-dmpd2nandurbar@gmail.com**
दुरध्वनी नंबर :- ०२५६४-२९५०४६

जा.क्र.नमप्रविपनं/ भांडार /१२०७ /सन २०२१ दिनांक :- ११ /०५ /२०२१

## दर पत्रक सुचना क्रमांक ०५ सन २०२१

तमाम वाहन पुरवठा अभिकरण /वाहन मालक /वाहन चालक यांना कळविण्यात येते की, या नंदुरबार मध्यम प्रकल्प विभागीय पथकांतर्गत असलेले दरा मध्यम प्रकल्प उपविभागीय पथक क्रमांक ०५ येथे नविन वाहन चालकासह रोजंदारी पध्दतीने वाहन सह चालक पुरविणे कामी दुहेरी पॉकीट पध्दतीने दरपत्रक ११ (अकरा) महिने कालावधी करीता मागविण्यात येत आहे.

त्या अनुषंगाने नविन वाहन पुरवठा अभिकरण/ वाहन मालक/ वाहन चालक यांच्याकडे प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी जारी केलेले वाहन चालविण्याची परवाना तसेच वाहनांचे सर्व दस्ताऐवज असणे आवश्यक आहे. पाकीट क्र.१ मागणीकृत वाहन तथा चालकाची संख्या एकूण एक

१) पाकीट – क्र.१
२) पाकीट – क्र.२

**पाकीट – क्र.१**

१) संबंधीत वाहन चालकाचे वाहन चालविण्याच्या परवान्याची खरी नक्कल.
२) संबंधित वाहन चालकाचे ओळखपत्र (आधार कार्ड, निवडणूक ओळख पत्र, पॅन कार्ड ) यांची खरी नक्कल.
३) संबंधित वाहनाचे लागणारे सर्व दस्तवऐवज ( RC, PUC, Insurance Valid ) सोवत तयार करावे.

**पाकीट – क्र.२**

वाहन चालकाच्या दैनिक वारा तास कामकाजाचा कालावधी ग्राहय धरून रोजंदारीचा दर.

**अटी व शर्ती**

१) प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे नोंदणीकृत वाहन व वाहन विमा, वाहन चालकाचा परवाना वाहन धारकाचे पॅनकार्ड, बॅक खाते असणे आवश्यक आहे व दरपत्रकासोबत छायांकित पत्र सादर करणे आवश्यक आहे.
२) वाहनाची मासिक देयकांची निधी उपलब्धतेनुसार अदायगी करणेत येईल.
३) वाहन प्रतिदिन भाडे दर १२ तासापर्यतचा कालावधी अर्धादिवस धरणेत यावा. मंजुर दरा व्यतिरिक्त कुठलाही भत्ता देण्यात येणार नाही.
४) वाहनाचा अपघात झाल्यास संपुर्ण जबाबदारी वाहन मालकाची/संस्थेची राहिल.
५) वाहनाचा दुरूस्तीचा व वाहन चालकाचा वेतनाचा खर्च वाहन मालकाकडे/संस्थेकडे राहिल.
६) या कार्यालयामार्फत वाहनाचे इंधन, टोल, पार्कीग चार्जेस भरणा करणेत येईल.
७) वाहन नादुरूस्त खराव, अपघातग्रस्त झाल्यास लगेच दुसरे वाहन उपलब्ध करून देण्याची जवाबदारी वाहन मालकाची/ संस्थेची राहिल.
८) आपण दिलेले दर हे सर्व करासहीत असूण एकूण भाडेदेयकाचा रककमेतुन १० टक्के आयकर (सेवाकर) कपात करणेत येईल तसेच ज्या वाहन मालकाचे जी.एस.टी रजिष्ट्रेशन (त्याच्या नंबरसह कागदपत्रे) असल्यास तसे या कार्यालयास अवगत करणेत यावे.
९) वाहन ताब्यात घेतल्यापासुन ते परत केल्यापर्यतचा कालावधी भाडे अदायगीसाठी धरण्यात येईल.

Scanned by CamScanner

१०) वाहनाच्या मेन्टनेसचा खर्च इतर तसेच अपघात झाल्यास त्यांची संपूर्ण जबाबदारी वाहन मालकाची/संस्थेची राहील.

११) टोल् पार्कींग शुल्क (चार्जेस ) वाहन वापरणारे कार्यालय करील.

१२) वाहनाचे/वाहनचालकाचे सर्व कागदपत्रे जसे नोंदणी, कर विमा, योग्यता प्रमाणपत्र परवाना पीयुसी चालकाचे अनुज्ञापती वैध असणे आवश्यक आहे.

१३) आयकर विभागाच्या नियमानुसार वैध/ लागु असलेल्या आयकर वाहन मालकाला भरावा लागेल.

१४) वरील दरा व्यतिरिक्त कुठलाही भत्ता/ चार्जेस देण्यात येणार नाही.

१५) वाहन लावण्याकरिता स्थानिकरित्या दरपत्रके /जाहिरातीव्दारे व्यापक प्रसिध्दी करून अभिकरणामार्फत करण्यात यावी व संस्थेशी स्टॅम्पवर आवश्यक करारनामा करून घ्यावा.

१६) किरकोळ स्वरूपाची दुरूस्ती एक दिवसाच्या आत व मोठया स्वरूपाची दुरूस्ती तीन दिवसाच्या आत करून देण्याची तसेच सदर कालावधीमध्ये पर्यायी वाहन सेवा पुरवण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील. पर्यायी वाहनाची व्यवस्था करून न दिल्यास वाहन सेवा गैरहजर बाबत मासिक भाडयाचे दर लक्षात घेता प्रती दिन प्रमाणे आवश्यक ती रक्कम देयकातुन कपात करण्यात येईल. किंवा पुरवठादाराने त्याच्याकडील वाहन नादुरूस्त अथवा इतर कारणामुळे उपलब्ध न करून दिल्यास त्या कालावधीत कार्यालयाने इतर वाहन भाडयाने लावल्यास त्यासाठी झालेला खर्च पुरवठा दाराला द्यावयाच्या रकमेतुन कपात केला जाईल.

१७) वाहनावर कोणत्याही प्रकारचा गुन्हा, कार्यालयीन प्रकरणे नसावीत.

१८) वाहनाने लॉगबुक वाहन चालकाने अद्यावत ठेवावयाचे असून संबंधित वाहन वापरणारे अधिकारी यांची स्वाक्षरी घ्यावी. लॉगबुक मध्ये फिरस्ती करणारे अधिकृत अधिकारी यांची स्वाक्षरी नसल्यास फिरस्ती ग्राहय धरली जाणार नाही व त्या फिरस्तीचा पुरवठादारास मोबदला दिला जाणार नाही.

१९) पुरवठादारास कार्यालयाकडून लॉगबुक पुरविण्यात येईल. वाहन भाडयाचा करार संपल्यानंतर मुळ लॉगबुक कार्यालयाच्या ताब्यात देण्यात यावे. लॉगबुक ही शासकीय दस्ताऐवज असल्यामुळे पुरवठादाराने लॉगबुक तात्काळ कार्यालयाच्या ताब्यात न दिल्यास कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. (एफ.आय. आर. दाखल करण्यात येईल.) यांची गंभीर नोंद घ्यावी.

२०) करार कालवधीत इंधनाचा भाव वाढल्यास कोणताही इंधन भाव वाढ फरक देण्यात येणार नाही.

२१) वाहन भाडे तत्वावर लावण्या संदर्भात अटी व शर्ती यामध्ये बदल करण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता नंदुरबार मध्यम प्रकल्प विभागीय पथक , नंदुबार यांनी राखुन ठेवला आहे.

२२) वाहनाचे कि.मी रिडींग हे वाहन मुख्यालयात आल्यापासुन मोजण्यात येईल.

वरील नमुद अटी व शर्तीची पुर्तता करणाऱ्या संस्थांकडुन वाहन मालक / वाहन चालकाकडून दरपत्रक मागविण्यात येत आहे. दरपत्रक हस्तांतरणाचे किवा टपालाव्दारे या कार्यालयास दि.२४/०५/२०२१ च्या १६.०० वाजे पर्यत किंवा त्यापुर्वी पोहचतील अश्या रितीने पाठवावीत. शक्य झाल्यास दरपत्रक त्यांच दिवशी उघडण्यात येईल.

**कामाचे स्वरूप**

१) नंदुरबार जिल्हा व परिसर क्षेत्रिय कार्यक्षेत्र.

२) कार्यकारी अभियंता यांचे परवानगीने नंदुरबार जिल्हा बाहेरील कार्यक्षेत्र जसे धुळे, जळगाव , नाशिक , मुंबई , नागपुर, इत्यादी.

कार्यकारी अभियंता,
नंदुरबार मध्यम प्रकल्प विभागीय पथक ,
नंदुरबार

**प्रत** :- मा.अधिक्षक अभियंता , धुळे पाटबंधारे प्रकल्प मंडळ धुळे यांना माहितीसाठी सविनय सादर.

Scanned by CamScanner